# 16

# धडे किनारी
# जीवनाच्या
## वर्षांनी
## शिकवलेले



dakshin

गेल्या १६ वर्षांपासून आम्ही मत्स्यव्यवसायिक आणि समुदायासोबत काम केलेलं आहे व समुद्री परिसंस्था आणि त्यावर अवलंबून असलेला समुदाय यांच्यातील गुंतागुंती - अभ्यासाच्या माध्यमातून समजून घेतल्या आहेत.

भारतातील मासेमारी जितकी विविध आहे तितकीच महत्त्वाची देखील आहे, परंतु गेल्या काही वर्षात प्रचंड आव्हानांना सामोरे जात आहे - संपुष्टात येणारी संसाधने, व्यवस्थापनातील कमतरता, बदलते हवामान इत्यादी.

या कालावधीत आम्ही जे काही शिकलो, ते तुमच्यासमोर मांडण्यासाठी, आमचा मच्छी मॅन – आमच्या ‘खाने के लिये बचाओ’ मोहिमेचा वर्चुअल मॅस्कॉट (प्रतीकात्मक व्यक्ती) – घेऊन आलाय, आमच्या कामातून मिळालेले ९ महत्त्वाचे धडे. हे धडे आमच्या वेबसाइटवरील लेखात दिलेले आहेत आणि त्यातील काही धडे हे भारतातील मासेमारी व किनाऱ्यांपट्ट्यांसाठी अधिक शाश्वत आणि सर्वसमावेशक बदल घडवू शकतात.

**लेखात नेमकं काय आहे त्याची एक झलक:**



**#1** मासेमारीत एकच उपाय सगळीकडे लागू होत नाही. काही वेळा ठिकाणांनुसार धोरणात बदल करावा लागतो, तथापि, त्या उपायांमागील मूलभूत धोरणं बऱ्याच वेळा विविध ठिकाणी एकसारखी लागू होऊ शकतात.





**#2** मासेमारी व्यवस्थापनात मच्छिमार आणि त्यावर आधारित समुदाय यांनी आघाडीवर असायला हवं! त्यांना वगळणे म्हणजे त्यांचं ज्ञान आणि कौशल्यही दुर्लक्षित केलं जातं, आणि त्याशिवाय कोणत्याही शाश्वत उपायांचा प्रभाव अपूर्ण राहतो.







**#3** मासेमारांची प्राधान्यं संवर्धनकर्त्यांच्या तुलनेत वेगळी असू शकतात. पण ह्याच विचारधारेतील वेगळेपणामुळे संवाद साधण्याची महत्वपूर्ण संधी निर्माण होते.





**#4** शाश्वततेसाठी सहकार्य आवश्यक आहे, दोषारोप नव्हे! ही जबाबदारी मत्स्यव्यवसायात असेल्याला सर्व घटकांनी वाटून घ्यायला हवी – मासेमारांपासून ग्राहकांपर्यंत – जेणेकरून समुद्रातील मासे ते लोकांच्या ताटातील मासे हा सगळा प्रवास एका साखळी प्रमाणे शाश्वत राहील.





**#5** स्थानिक पर्यावरणीय ज्ञान (LEK) हे शास्त्रीय माहिती इतकंच महत्त्वाचं आहे! कारण जे या परिसंस्थांवर परस्पर अवलंबून असतात त्यांनाच ती सर्वाधिक समजते.





**#6** महिला या मासेमारीच्या क्षेत्रातील दुर्लक्षित आधारस्तंभ आहेत. तरी त्यांना अनुदानं, संसाधनं आणि प्रतिनिधित्व यात मोठ्या असमानतेचा सामना करावा लागतो. त्यांच्या भूमिकेचं मूल्यमापन करणं हे न्याय्य धोरणं तयार करण्यासाठी आवश्यक आहे, जे खऱ्या अर्थाने त्यांना भागीदार म्हणून मान्यता देईल.



**#7** तरुणांचा सहभाग दीर्घकालीन शाश्वततेसाठी अत्यावश्यक आहे. ते त्वरीत योजना राबवू शकतात आणि मासेमार समुदायाला पर्यावरणपूरक पद्धती स्वीकारायला प्रेरित करू शकतात.







**#8** यशस्वी संवर्धन नेतृत्व हे फक्त औपचारिक अधिकारावर आधारित नसतं. समुदायांना सशक्त केल्यास संवर्धनाचे प्रयत्न अधिक समावेशक, स्थानिकआणि यशस्वी होतात.





**#9** दीर्घकालीन प्रतिबध्दता ही मासेमारी व्यवस्थापनासाठी महत्वाची आहे. ती विश्वास निर्माण करते आणि सहकार्य वाढवते जे प्रभावी सहभागी व्यवस्थापनासाठी आवश्यक आहे.



Khane ke liye bachao

# चला, सहभागी व्हा
# #KhaneKeLiyeBachao!
# मध्ये !

**ADDRESS**
2203, 8th Main Rd, MCECHS Layout, D Block, Sahakar Nagar,
Bengaluru, Karnataka 560092

**PHONE**
+91 80 42113509

**EMAIL**
info@dakshin.org

dakshin